# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक ३१.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ३०/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ८३,७००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.३०/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ४२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ७१७.८८ लिटर दारू असा एकुण ०१,१५,३६०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. ३०/१०/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे कळमनुरी येथे ०२ तसेच पोस्टे हिंगोली शहर व पोस्टे आ. बाळापुर येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०४ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण १५,३७०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.